स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'मानव्यविद्याशाखेअंतर्गत' मराठी विषयातील पीएच.डी (विद्यावाचस्पती) पदवीसाठी
सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

"व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील ग्रामीण व प्रादेशिक संदर्भ : एक अभ्यास"

संशोधक

प्रकाश मुरलीधर साडेगावकर

परभणी.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. शिवाजी बाबुराव परळे

सहाय्यक प्राध्यापक

मराठी विभाग,

संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी.

मार्च - 2022

"व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील ग्रामीण व प्रादेशिक संदर्भ एक अभ्यास"

प्रास्ताविक :-

कथा हा साहित्यप्रकार काव्याइतकाच प्राचीन आहे. मानवाच्या विकासाबरोबरच कथेचाही विकास घडून आलेला दिसतो. रामायण, महाभारत या महाकाव्यात कथाच सामावलेली आहे. महानुभाव साहित्यात देखील कथा येतात. कथा या वाङ्मय प्रकाराचा प्रभाव प्राचीन काळापासुन भारतीय समाजमनावर असलेला दिसतो.

ग्रामीण जीवन जाणिवांचे चित्रण करणारी कथा म्हणजेच ग्रामीण कथा होय. या जीवन जाणिवा मुख्यत्वे ग्रामीण परिसर व कृषीनिष्ठ परंपरा व तिथल्या समाज जीवनाशी निगडीत असलेल्या दिसतात. सुरुवातिच्या काळातील ग्रामीण कथा प्रादेशिक कथांच्या रुपात असलेली दिसते. इ.स. 1898 च्या सुमारास लिहल्या गेलीली हरीभाऊ आपटे यांची ‘काळ तर मोठा कठीण आला' या कथेतून सर्वप्रथम ग्रामीण जीवनातील भयावह अशा दुष्काळाचे चित्रण आलेले दिसते.

साधारपणे 1925 पासून ग्रामीण जीवनाचे चित्रण कथेतून यायला सुरुवात झाली. ग.ल. ठोकळ, र.वा. दिघे, द.ता.भोसले, रा.रं. बोराडे, भास्कर चंदनशिव यांनी प्रादेशिक स्वरुपाची ग्रामीण कथा लिहली. 1925 ते 1945 या काळातील ग्रामीण जीवनाचे चित्रण हे तितकेसे शुध्द ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे नव्हते. शहरी वाचकांना ग्रामीण जीवनाचा परीचय करुन द्यावा. अशा प्रकारचे हे लेखन होते. ख-या अर्थाने ग्रामीण कथेला सुरुवात श्री. म. माटे यांच्या ‘उपेक्षितांचे अंतरंग' या कथासंग्रहापासून होते. ग्रामीण जीवनातील उपेक्षित स्तराचे वास्तवपूर्ण चित्रण त्यांनी आपल्या कथांतून केले. माटयांची परंपरा पुढे चालविण्याचे कार्य व्यंकटेश माडगूळकर यांनी केले.

इ.स. 1945 च्या सुमारास उदयाला आलेले महत्वाचे नवकथाकार म्हणून व्यंकटेश माडगूळकर यांच्याकडे पाहिले जाते. ग्रामीण कथेचे स्वरूप अंर्तबाहय पालटण्याचे श्रेय व्यंकटेश माडगूळकर यांच्याकडे जाते. माडगूळकरांच्या कथेतून वास्तव ग्रामीण जीवनाचे चित्रण आले आहे. त्यांनी आपल्या कथेत ग्रामीण भागातील सर्व स्तरातील समाजजीवनाचे चित्रण केले आहे. व्यंकटेश माडगूळकर यांची कथा ग्रामीण जीवनाचे चित्रण तर करतेच त्याचबरोबर

माणदेशातील विशिष्ट अशा प्रदेशाचे प्रतिनिधत्व करते. त्यामुळे एकाच वेळी ग्रामीण व प्रादेशिक असे दोन्ही संदर्भ या कथेला प्राप्त होतात. त्या अनुषंगाने व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील ग्रामीण व प्रादेशिक संदर्भ या घटकाचा अभ्यास प्रस्तूत शोधप्रबंधातून करण्याचे प्रयोजिले आहे.

विषयाचे महत्व व निवड :-

इ.स. 1945 च्या सुमारास मराठी साहित्यात नवसाहित्याच्या माध्यमातून मोठे परीवर्तन घडून आलेले दिसून येते. हे नवसाहित्य प्रथम काव्य व कथा या साहित्यप्रकारात अवतरले. नव्या प्रवृत्तीच्या व नव्या प्रकृतीच्या साहित्याचा उदय झाला. कथेमध्ये हे नवयुग गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा. भावे आणि व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथालेखनातून आले. या कालखंडातील ग्रामीण कथा ही अनेक वेगवेगळ्या प्रेरणांनी लिहली जात होती. तिचे स्वरुप बदलत चालले होते.

मराठी ग्रामीण कथेचे स्वरुप अंर्तबाहय पालटण्याचे श्रेय व्यंकटेश माडगूळकरांकडे जाते. अद्भुतात, काव्यात्मकतेत, कल्पनारम्यतेत रमणारी ग्रामीण कथा माडगूळकरांनी अधिक वास्तववादी व जीवनस्पर्शी बनवली. माडगूळकरांनी त्यांचा जगला भोगला दुष्काळी माणदेश आणि तिथला रंजला गांजला माणूस मराठी कथेत आणला. माडगूळकरांच्या जिवंत अनुभवातून त्यांची कथा जन्मास आली. त्यांच्या कथेतून माणगंगेच्या परीसरातील माणसांचे दारीद्रय, अंधश्रद्धा, त्यांच्या वाटयाला येणारे भोग, त्यांचे साधेभोळे तत्वज्ञान यातून संपूर्ण जीवनदर्शन माडगूळकर घडवितात. माडगूळकरांनी आपल्या कथेत कथानकाला अधिक महत्व दिले नाही. त्यांची कथा जीवनानुभवाशी प्रामाणिक राहून लिहल्या गेलेली कथा आहे आणि म्हणून ती लक्षणीय ठरते.

मराठी ग्रामीण व प्रादेशिक कथेचा अभ्यास करावयाचा झाल्यास तो माडगूळकरांच्या अस्सल ग्रामीण कथेचा अभ्यास केल्याशिवाय पूर्ण होणार नाही. विद्यार्थी दशेपासून मी माडगूळकरांच्या कथा, कांदबऱ्यांकडे आकर्षित झालो होतो. त्यांची 'झेल्या सारखी कथा अनेक दिवस माझ्या मनात साठून राहीली होती. माणसे जशी जीवन जगतात, सुख-दुःखाला सामोर जातात. त्यांची कथा त्याच खऱ्या हृदयाचा ठाव घेतल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या कथेतील

व्यक्तिरेखा या कायम माझ्या मनात घर करून राहिल्या आहेत. व्यंकटेश माडगूळकरांच्या वैशिष्ट्पूर्ण ग्रामीण कथांचा अनेक वेगवेगळ्या अंगाने अभ्यास करता यावा, यासाठी मी माडगूळकरांच्या कथेतील ग्रामीण जीवनानूभवाचे स्वरुप कसे आहे? ती संपुर्ण गावगाडयाचे चित्रण करते का? त्यांच्या कथेची भाषा, समाजमन, स्त्रीजीवन, प्राणीजीवन, शेती, ग्रामीण जीवनातले प्रश्न, त्यांच्या कथेतील प्रादेशिकता यांचा अभ्यास करता यावा यासाठी मी "व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील ग्रामीण व प्रादेशिक संदर्भ एक अभ्यास" या अनुषंगाने संशोधन करण्याचे निश्चित केले आहे.

संशोधनाची व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतून चित्रित झालेल्या ग्रामीण समाजजीवनाच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे, त्या कथेतून चित्रित होणारे ग्रामीण जीवनानूभव कोणत्या स्वरूपाची आहेत? ती कथा ग्रामीण कृषी संस्कृती, गाववाडा, ग्रामीण निसर्ग व परिसराचे चित्रण कसे करते? त्यांच्या कथेतून ग्रामीण वास्तवाचे आकलन कितपत होते? ग्रामीण मनाचे, ग्रामीण संवेदनशिलतेचे दर्शन कथेतून कसे घडते? त्यांची कथा ग्रामीण जीवनातील दलितांचे व उपेक्षितांचे प्रश्न मांडते का? त्यांच्या दुःखाला वाचा फोडण्याचे काम कितपत करते? इत्यादी प्रश्नांचा वेध घेण्यात येईल. तसेच ज्या भुप्रदेशात ते राहतात, त्याचे संदर्भ, त्याची म्हणून कांही वैशिष्टये, त्यांच्या कथेत कसे स्पष्टपणे दिसतात? त्यांच्या कथेतून येणाऱ्या व्यक्तिरेखांची स्वभाव वैशिष्टये कोणती आहेत? तसेच त्यांच्या कथेतील भाषाशैलीचा अभ्यास करणे ही प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती आहे.

संशोधनाची मर्यादा :-

व्यंकटेश माडगूळकर यांचे आधारभूत पंधरा कथासंग्रह आहेत. हे या संशोधनाची लिखित सामुग्री आहे. परंतु या कथांचा केवळ ग्रामीण व प्रादेशिक समाजजीवनाच्या संदर्भातच अभ्यास अपेक्षित असल्यामुळे केवळ ग्रामीण व प्रादेशिक समाजजीवनाचेच चित्रण करणाऱ्या कथांच्या संदर्भात प्रस्तुत अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामुळे या संशोधनास अशी काही मर्यादा आखून घेतली आहे.

संशोधन पद्धती :-

व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथासाहित्याचा अभ्यास करताना कुठलीही विशिष्ट अशी एकच अभ्यासपद्धती वापरता येत नाही. कथेची परंपरा अभ्यासतांना ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करावा लागतो. तसेच सामाजिक जीवनाच्या प्रथा, परंपरा, संस्कृती इ. बाबींचा अभ्यास करताना समाजशास्त्रीय संशोधन पद्धती वापरावी लागते. तर दोन कथाकारातील साम्यभेद तपासावयाचे असतील तर तेंव्हा तौलनिक संशोधन पद्धतीचा वापर करावा लागतो. तसेच काही ठिकाणी विवेचनपर पद्धती ही उपयुक्त ठरणारी आहे. म्हणून उपलब्ध साहित्याचा विवेचक अभ्यास यात केला जाईल.

संशोधनाची साधने :-

अ) प्राथमिक साधने :- व्यंकटेश माडगूळकर यांचे आधारभूत पंघरा कथासंग्रह हे या संशोधन कार्याची प्राथमिक साधने ठरतात. यात माणदेशी माणसे, हस्ताचा पाउस, गावाकडच्या गोष्टी, काळी आई. वारी, वाळूचा किल्ला, सीताराम एकनाथ, घरदार, उंबरठा, डोहातील सावल्या. जांभळाचे दिवस, कांगारुचे चांगभले, बाजार, रानमेवा, वाघाच्या मागावर इ. कथासंग्रहाचा उपयोग प्रस्तूत संशोधनाच्या प्राथमिक साधनात केला आहे.

ब) दुय्यम साधने :- मराठी ग्रामीण व प्रादेशिक साहित्यावरील समीक्षा ग्रंथ, मराठी ग्रामीण कथेवरील संशोधनपर व समीक्षात्मक लेखन ही या संशोधनाची दुय्यम साधने आहेत. यात व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेवर अनेक नियतकालीकांमध्ये व समीक्षाग्रंथामध्ये लिहलेले लेख, माडगूळकर यांचे ‘प्रवास एका लेखकाचा’ हे आत्मपर लेखन तसेच माडगूळकरांनी त्यांच्या कथासंग्रहाला लिहलेल्या प्रस्तावना यांचा उपयोग केला जाईल. तसेच व्यंकटेश माडगूळकर यांच्या साहित्यावर या अगोदर विविध विद्यापीठांमध्ये झालेले संशोधन या सर्व साहित्याचा उपयोग प्रस्तूत संशोधनाच्या दुय्यम साधनामध्ये करण्यात आला आहे.

संशोधनाची उदिष्टे :-

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उदिष्टे मांडण्यात आलेली आहेत.

1) मराठी ग्रामीण कथेच्या स्वरुपाचा अभ्यास करणे.

2) मराठी ग्रामीण कथेतील व्यंकटेश माडगूळकर यांचे स्थान व एकूण ग्रामीण कथेतील त्यांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

3) व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील ग्रामीण जीवनानुभवाच्या स्वरुपाचा अभ्यास करणे.

4) व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतून येणा-या प्रादेशिक वैशिष्ट्यांचा शोध घेणे.

5) व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील दलित व उपेक्षितांच्या जीवनानुभवाचे स्वरुप अभ्यासणे.

6) व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतून येणा-या विविध प्रवृत्ती व प्रकृतीच्या व्यक्तिरेखांचा शोध घेणे.

7) व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतून येणा-या भाषाशैलीचा अभ्यास करणे.

8) व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील प्रादेशिकता, ग्रामीण जीवनातील निसर्ग या घटकांचा अभ्यास करणे.

9) व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतून आलेली पारंपारीक ग्रामव्यवस्था आणि गावगाडा, लोकजीवन व लोकमानस यांचा अभ्यास करणे.

10) व्यंकटेश माडगूळकर यांची कथालेखनामागील भूमिका व त्या कथेच्या प्रेरणा व प्रवृत्तींचा शोध घेणे.

11) व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतून येणा-या सांस्कृतिक व मानवी मूल्यांचा अभ्यास करणे.

12) नवकथा या साहित्यप्रकारात व्यंकटेश माडगूळकर यांचे योगदान व नवकथा म्हणून त्यांच्या कथेत आलेल्या वैशिष्टयांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :-

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहीतके मांडण्यात आलेली आहेत.

1. व्यंकटेश माडगूळकर ग्रामीण साहित्यातील महत्वाचे लेखक आहेत.
2. व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या कथेतून विविध पातळ्यांवरील ग्रामीण वास्तवाचा वेध घेतला आहे.
3. व्यंकटेश माडगूळकर हे ग्रामीण भागातील दलित, उपेक्षित यांच्या तत्कालीन परिस्थीतीचे व त्यांच्या अर्तंमनाचे प्रभावी चित्रण त्यांच्या कथेतून घडवतात.

4. व्यंकटेश माडगूळकर यांनी ग्रामीण भागातील अनेकविध प्रवृत्तीच्या व्यक्तीचे ठसठशीत चित्रण केले आहे.
5. व्यंकटेश माडगूळकर हे आपल्या कथेतून अस्सल ग्रामीण बोलीचा वापर करतात.
6. व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या कथेतून ग्रामीण जीवनातील निसर्ग व परिसराचे अतिशय प्रभावीपणे चित्रण केले आहे.
7. व्यंकटेश माडगूळकर यांनी मराठी ग्रामीण कथेत परीवर्तन घडवून ग्रामीण कथा वास्तवाच्या जवळ आणली.
8. व्यंकटेश माडगूळकर यांनी शुध्द कलावादी प्रेरणेने कथालेखन केले आहे.
9. व्यंकटेश माडगूळकरांनी यांच्या कथेतून तत्कालीन समाजजीवन, प्रथा, परंपरा ग्रामव्यवस्था, गावगाडा यांचे प्रभावी चित्रण केले आहे.

शोध प्रबंधाची प्रकरणे :-

व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील ग्रामीण व प्रादेशिक संदर्भाचा अभ्यास करताना, अभ्यासाच्या सोयीसाठी काही प्रकरणे निश्चित केली आहेत.

प्रकरण पहिले :- मराठीतील ग्रामीण व प्रादेशिक साहित्याचे स्वरूप

प्रकरण दुसरे :- व्यंकटेश माडगूळकर यांच्या साहित्याचे सिंहावलोकन

प्रकरण तिसरे :- व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील ग्रामीण व प्रादेशिक संदर्भ

प्रकरण चौथे :- व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांची वाङ्मयीन वैशिष्टये

प्रकरण पाचवे :- मुल्यमापन आणि निष्कर्ष

संशोधनाची रुपरेषा :-

प्रकरण पहिले:- मराठीतील ग्रामीण व प्रादेशिक साहित्याचे स्वरूप

प्रस्तुत प्रकरणात मराठी वाङ्मयातील ग्रामीण व प्रादेशिक साहित्याची संकल्पना, स्वरुप कशा प्रकारचे आहे? याचा अभ्यास करण्यात येईल. मराठीतील ग्रामीण व प्रादेशिक साहित्य परंपेरचा आढावा घेण्यात येईल. ग्रामीण व प्रादेशिक स्वरुपाच्या कथासाहित्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात येईल. ग्रामीण व प्रादेशिक कथा व तिच्या स्वरुपवैशिष्ट्यांचा अभ्यास प्रस्तूत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण दुसरे :- व्यंकटेश माडगूळकर यांच्या साहित्याचे सिंहावलोकन

प्रस्तुत प्रकरणात व्यंकटेश माडगूळकर यांच्या वाङ्.मयीन कर्तृत्वाचा वेध घेण्यात येईल. यात व्यंकटेश माडगूळकरांची जडणघडण कशी झाली. त्यांच्या कथालेखनामागील प्रेरणा व प्रवृत्ती कोणत्या होत्या, त्यांच्यावर कोणत्या कथालेखकाचा प्रभाव होता, त्यांची साहित्य लिखाणामागील भुमिका, व्यंकटेश माडगूळकर यांचे कथालेखन, कादंबरीलेखन, नाटयलेखन, ललितलेखन, पटकथालेखन इ. साहित्याचा आढावा या प्रकरणात करण्यात घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे :- व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील ग्रामीण व प्रादेशिक संदर्भ

प्रस्तुत प्रकरणात माडगुळकर यांच्या कथेतील ग्रामीण जीवनानुभव कोणत्या स्वरुपाचे आहेत. याचा वेध घेण्यात येईल. माडगूळकर यांच्या कथेतुन घडुन येणारे कृषीसंस्कृतीचे दर्शन, त्यांच्या कथेतुन येणारी प्रादेशिक वैशिष्टये, त्यांच्या कथेतुन येणारे लोकसंकेत, गावगाडा व बलुतेदारी, माडगुळकरांच्या कथेतुन येणारे निसर्ग व ग्रामीण परीसराचे चित्रण कशा स्वरुपाचे आहे. याचा अभ्यास करण्यात येईल. माडगूळकरांच्या कथेतुन होणारे ग्रामीण वास्तवाचे आकलन, माडगूळकर यांच्या कथेतील ग्रामीण संवेदनशीलता, राजकीय जीवनानुभव, माडगुळकर यांच्या कथेतुन होणारे ग्रामीण मनाचे दर्शन, ईत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे:- व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांची वाङ्.मयीन वैशिष्टये

सदर प्रकरणात माडगूळकर यांच्या कथेच्या भाषा वैशिष्ट्यांचा अभ्यास

प्रकरण पाचवेः- मुल्यमापन आणि निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणात या संशोधनातुन हाती आलेले निष्कर्ष नोंदविण्यात येतील.

परिशिष्ट- 01

आधारभुत कथासंग्रह

1.	माणदेशी माणसे	:-	कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 1949
2.	हस्ताचा पाऊस	:-	उत्कर्ष प्रकाशन पुणे 1985
3.	गावाकडच्या गोष्टी	:-	उत्कर्ष प्रकाशन पुणे 1985
4.	काळी आई	:-	उत्कर्ष प्रकाशन पुणे 1962
5.	वारी	:-	कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 1981
6.	वाळुचा किल्ला	:-	अनमोल प्रकाशन पुणे 1976
7.	सीताराम एकनाथ	:-	मौज प्रकाशन मुंबई 1966
8.	घरदार	:-	वोरा अॅण्ड कंपनी मुंबई 1959
9.	उंबरठा	:-	उत्कर्ष प्रकाशन पुणे 1960
10.	डोहातील सावल्या	:-	मेहता पब्लीशिंग हाऊस पुणे 2000
11.	जांभळाचे दिवस	:-	कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 1976
12.	कांगारूचे चांगभले	:-	कुलकर्णी ग्रंथागार प्रकाशन पुणे 1962
13.	बाजार	:-	उत्कर्ष प्रकाशन पुणे 1977
14.	वाघाच्या मागावर	:-	कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे 1962
15.	रानमेवा	:-	श्रीविद्या प्रकाशन पुणे 1978

परिशिष्ट- 02

संदर्भग्रंथ

1.	इंदुमती शेवडे	: -	मराठी कथा उगम आणि विकास, प्रथमावृत्ती 1973 सोमय्या प्रकाशन मुंबई
2.	डॉ. वासुदेव मुलाटे	: -	ग्रामीण कथाः स्वरूप आणि विकास, तृ.आ. 2012, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद.
3.	मोहन पाटील	: -	ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, दु.आ. 2008 स्वरुप प्रकाशन औरंगाबाद
4.	डॉ. आनंद यादव	: -	मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या दु.आ. 1984 मेहता प्रकाशन पुणे.
5.	डॉ. आनंद यादव	: -	ग्रामीणता साहित्य आणि वास्तव, प्र.आ. 1981 मेहता प्रकाशन पुणे.
6.	डॉ. आनंद यादव	: -	मराठी साहित्य समाज आणि संस्कृती, प्र.आ. 1999 मेहता प्रकाशन पुणे.
7.	डॉ. श्रीराम गुंदेकर	: -	ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन प्र.आ. 1999 दिलीपराज प्रकाशन पुणे.
8.	द.ता.भोसले	: -	ग्रामीण साहित्य एक चिंतन, प्र.आ. 1988 दिलीपराज प्रकाशन पुणे.
9.	डॉ. वासुदेव मुलाटे	: -	ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही दु.आ. 2005 स्वरुप प्रकाशन औरंगाबाद.
10.	डॉ. नागनाथ कोत्तापल्ले	: -	ग्रामीण साहित्य स्वरुप व शोध प्र.आ.1985 मेहता प्रकाशन पुणे.
11.	डॉ. मथू सावंत	: -	कथाकार भास्कर चंदनशिव, प्र.आ.2004 संगत प्रकाशन पुणे.
12.	व्यंकटेश माडगूळकर	: -	प्रवास एका लेखकाचा, दु.आ.1998 मॅजेस्टीक प्रकाशन मुंबई.

संशोधक
प्रकाशक मुरलीधर साडेगावकर
एम.ए.(मराठी) बी.एड.नेट
नवा मोंढा, परभणी

मार्गदर्शक
डॉ.शिवाजी बाबुराव परळे
एम.ए.(मराठी), नेट, पी.एच.डी
सहाय्यक प्राध्यापक,
मराठी विभाग,
संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय,
परभणी